**कृपया प्रसिद्धीसाठी** **25 जून 2011**

# माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी मुंबई येथे 25 जून 2011 रोजी प्रसिद्धीस दिलेले निवेदन

**मुंबई, शनिवार:** "गेल्या महिन्यात पेट्रोलच्या दरात रु.5 प्रतिलिटर वाढ केल्यानंतर काल पेट्रोलियम मंत्री श्री. जयपाल रेड्डी यांनी जाहिर केलेली डिझेल, स्वयंपाकाचा गॅस आणि केरोसिन यांची दरवाढ ही पेट्रोलियम क्षेत्रात एकाच झटक्यात झालेली सर्वांत जास्त दरवाढ असून त्यामुळे 'आम आदमी' चे अक्षरशः कंबरडेच मोडणार आहे. या दरवाढीबरोबरच रिझर्व्ह बँकेने ही गेल्या एका वर्षात दहा वेळा व्याजदर वाढविल्याने महागाई वाढीच्या वेगाला अधिकच गती प्राप्त होणार आहे. काँग्रेस सरकारने आम आदमीचा विश्वासघात केला असून संवेदनहीनताही दाखविलेली आहे'', अशी प्रतिक्रिया माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी आज मुंबई येथे व्यक्त केली.

श्री. राम नाईक पुढे म्हणाले की पेट्रोलियम मंत्री श्री. जयपाल रेड्डी यांचे 'ही वाढ कमीत कमी आहे आणि ग्राहक ती स्वीकारतील' हे वक्तव्य म्हणजे जखमेवर मीठ चोळण्याचाच प्रकार आहे. महागाईमुळे गरीबांची आणि मध्यमवर्गीयांची जी फरपट होत आहे याची त्यांना जाणीवच दिसत नाही.

''भारताच्या शेजारी म्हणजेच श्रीलंका, बांगलादेश आणि पाकिस्तान या देशांतील स्वयंपाकाचा गॅस आणि केरोसिन यांच्या तुलनात्मक किंमती जाहिर करुन श्री. जयपाल रेड्डी, पेट्रोलियम मंत्री यांनी अर्धसत्य सांगून जनतेची फसवणूक केली आहे. श्री. रेड्डी यांनी हे ही जाहिर करावयास पाहिजे होते की भारतात पेट्रोलचा दर रु. 68.33 आहे तर श्रीलंकेत रु. 46.28 (रु. 22.05 कमी), बांगलादेश मध्ये रु. 45.16 (रु. 23.17 कमी), तर पाकिस्तान मध्ये रु. 42.23 (रु. 26.10 कमी) आहे. तसेच डिझेलचा दर भारतामध्ये रु. 47.25 असून त्याच्या तुलनेत श्रीलंकेत रु. 31.55 (रु.15.70 कमी), बांगलादेश मध्ये रु. 26.66 (रु. 20.59 कमी) असा आहे. याशिवाय कमाल म्हणजे पेट्रोलचा दर रु. 68.33 आहे तर विमानासाठी लागणारे अधिक क्षमतायुक्त इंधन (एटीएफ) चा दर हा फक्त रु. 58.60 प्रतिलिटर म्हणजेच रु. 9.73 ने स्वस्त आहे. याचा अर्थ असा की चांदी पेक्षा सोने स्वस्त आणि भाकरीपेक्षा पुरणपोळी स्वस्त'', असेही श्री. राम नाईक म्हणाले.

''वरील परिस्थितीचा विचार करुन काँग्रेस सरकारने नवे पेट्रोलियम धोरण जाहिर केले पाहिजे तसेच केलेली भयंकर दरवाढ मागे घेतली पाहिजे. भारतीय जनता पार्टी या दरवाढीच्या विरोधात आंदोलन सुरु करीत आहे'', असेही पत्रकाच्या शेवटी श्री. राम नाईक म्हणाले.

**(कार्यालय सचिव)**